# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 23/09/2023 (शनिवार) दुपार

---

### चोरी

**१) पोस्टे नरखेड:—** अंतर्गत वार्ड क्र. ०५ नरखेड येथे दिनांक १९/०९/२०२३ चे १४.०० वा. ते दिनांक २१/०९/२०२३ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— आकाश रवि सोमकुंवर, रा. वार्ड क्र. ०५ नरखेड याला शासनाकडुन नविन घरकुल मिळाल्याने दिड महिन्यापुर्वी नविन घराचे बांधकाम सुरू केले होते. परंतु त्यांचेकडे पैसे नसल्याने त्याने आठ दिवसापासुन घराचे बांधकाम बंद ठेवले होते व दिनांक १५/०९/२०२३ रोजी तो नागपूरला निघुन गेला. तेव्हा त्याने बांधकामासाठी आणलेले ०६ एम. एम., १० एम. एम. व १२ एम. एम. च्या अशा ४० किलो लोखंडी सलाखी किंमती अंदाजे २४,०००/—रू. घरासमोर ठेवल्या होत्या व तो दिनांक २१/०९/२०२३ रोजी नागपूर येथुन घरी परत आला असता त्याने ठेवलेल्या लोखंडी सलाखी त्याला दिसल्या नाही. म्हणुन त्याने आजुबाजुला शोध घेतला असता आरोपी नामे— **अभय युवराज कठाणे, रा. नरखेड** याने चोरून नेल्याचे समजले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक शाबिर शेख पोस्टे नरखेड मो. नं. ९७६५८१०३८८ हे करीत आहे.

**२) पोस्टे रामटेक :—** अंतर्गत २० किमी अंतरावर मौजा साटक ता. पारशिवनी येथे दिनांक २१/०९/२०२३ चे १७.०० वा. ते २२/०९/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे—सुदर्शन भिमरावजी वाडीभस्मे, वय ३४ वर्ष, रा. साटक ता. पारशिवनी हा ज्या ठिकाणी आपल्या सर्व गाडया व सामान ठेवतो त्या ठिकाणी दिनांक २१/०९/२०२३ चे १७.०० वा. पाहणी करायला गेला असता सर्व सामान बरोबर होते. यातील फिर्यादी हा पडीत शेतामध्ये ठेवलेल्या गाडया व सामान बघायला गेला असता फिर्यादीला तेथे ठेवलेल्या सामानापैकी १) दोन पोकलॅड सिलेंडर किंमती ४०,०००/— रू. २) खिडकीच्या १२ ग्रील किंमती १२,०००/—रू. ३) १२ मशिन पिन (लोखंडी) किंमती २४,०००/— रू. ४) लोखंडी आय बिम अडीच फुट लांबिचे चॅनल, कबाड किंमती १०,०००/— रू. ५) ट्रॅक्टर पट्टा १ किंमती १०००/— रू असा एकुण ८७,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कार्तिक सोनटक्के पो.स्टे. रामटेक मो. नं. ९४०५९०३५२८ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर